# शाहू महाराज : कला, संस्कृती आणि खेळामधील योगदान

**प्रा. वंदना शामराव खोराटे,** सहाय्यक प्राध्यापिका, डॉ. घाळी महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर,
मोबाईल : ९६५७७३५०५६. ई–मेल : dnathpatil@gmail.com

---

**प्रस्तावना :**

भारतीय संस्कृतीत कलेला अनन्यसाधारण महत्व आहे. म्हणूनच १४ विद्या आणि ६४ कलांचा अधिपती असणाऱ्या गजाननाला आजही नमन केले जाते. महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व पु. ल. म्हणतात, ''उपजिविकेसाठी आवश्यक असणाऱ्या विषयाचं शिक्षण जरूर घ्या. पोटापाण्याचा उद्योग जिद्दीने करा. पण एवढयावरच थांबू नका. साहित्य, चित्र, संगीत, नाटय, शिल्प, खेळ यातल्या एखाद्या तरी कलेशी मैत्री जमवा. पोटापाण्याचा उद्योग तुम्हाला जगवेल. पण कलेशी जमलेली मैत्री तुम्ही का जगायचं, हे सांगून जाईल.'' असाच कलेच्या प्रांगणातील एक उपासक म्हणजे लोकनायक राजर्षी शाहू महाराज...!

करवीरच्या पावन भूमीत कला पेरण्याचे, उगविण्याचे तिला फुलविण्याचे थोर कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केल्यामुळेच या करवीर नगरीला 'कलानगरी' असे संबोधले जाते. महाराजांच्या औदार्याने व कलाकारांच्या उत्साहाने, सर्व प्रकारच्या कला बहरात येऊन, त्यांनी अक्षय किर्ती संपादन केली. नाटक, गायन, चित्रकला या इतक्या फुलल्या की या कलांनी कोल्हापुराचे नाव देशभरात पोहचविले, तर कुस्तीने मुकुटच चढविला.

विसाव्या शतकातील भारतातील मोठया नेत्यांच्या मालिकेत आणि आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकारांमध्ये कोल्हापूरचे राजर्षी शाहू छत्रपती यांची गणना केली जाते. अवघ्या २८ वर्षांच्या कारकीर्दीत शाहू महाराजांनी कोल्हापूर शहराला 'कलापूर' बनवले.

**१) शाहू महाराजांचे बालपण आणि शिक्षण :**

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म २६ जुलै १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात झाला. कागलचे जहागीरदार जयसिंगराव आप्पासाहेब घाटगे हे त्यांचे जन्मदाते वडिल व राधाबाई ही त्यांची जन्मदाती माता. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंतराव होते. ते दहा वर्षांचे असताना कोल्हापूरचे राजे चौथे शिवाजी यांची राणी आनंदीबाई हिने १८ मार्च १८८४ रोजी त्यांना दत्तक घेतले व ते कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती शाहू महाराज झाले.

इ.स. १८८५ मध्ये त्यांना शिक्षणासाठी राजकोट येथे पाठविण्यात आले. तेथे त्यांनी ४ वर्षे शिक्षण घेतले. त्यानंतर ते कोल्हापूरला परतल्यावर धारवाड येथे शिक्षणासाठी गेले. तेथे सर एस.एम्.क्रेजर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यकारभार, इतिहास, इंग्रजी, भाषा इ. विषयांचे शिक्षण घेतले. धारवाड येथे शिक्षण घेत असतानाच बडोद्याचे मराठी सरदार गुणाजीराव खानविलकर यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याबरोबर ६ एप्रिल, १८९१ रोजी शाहू महाराजांचा विवाह झाला. शिक्षणक्रम संपल्यानंतर वयाच्या २० व्या वर्षी २ एप्रिल १८९४ रोजी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतली.

**२) साहित्यिकांचा आधारवड :**

'बहुजन हिताय । बहुजन सुखाय।' हा मूलमंत्र जपणाऱ्या या राजाने लेखक, कवी, शाहीर, संशोधक व पत्रकार या सर्वच साहित्यिक मंडळींवर उदंड प्रेम केले. त्यांना भरभरून आर्थिक सहाय्य केले. त्यांच्या अडीअडचणीच्या काळात हा राजा त्यांच्या पाठीशी एखाद्या पहाडासारख उभा राहिला.

प्रबोधनकार ठाकरे हे 'भिक्षुकशाहीचे बंड' हा ग्रंथ लिहित होते. या ग्रंथाचे लेखन करण्यासाठी कोणते संदर्भग्रंथ वापरावेत अशी शाहूंना विचारणा केली. तेव्हा क्षणाचाही विलंब न करता राजर्षींनी ठाकरेंना अनेक संदर्भग्रंथ सुचविले. त्यामध्ये 'सॅव्हेलचा प्रीस्ट क्राफ्ट ॲण्ड किंग क्राफ्ट', 'इंगरसॉल्स रायटिंग्ज ॲण्ड स्पीचेस', अमेरिकेतील 'आर.पी.ए.' सीरीजची पुस्तके यांचा समावेश होता. इतकेच नव्हे, तर 'भिक्षुकशाही' प्रमाणे राजेशाही देखील मानवतेला जाचक ठरत आहे. याचाही विचार करण्याकडे प्रबोधनकारांचे लक्ष वेधले. कोणत्या संदर्भग्रंथात कोणता विषय आहे याविषयी महाराज जिव्हाळयाने सांगत होते. महत्वाची बाब म्हणजे महाराजांनी सुचविलेल्या ग्रंथांपैकी एकही संदर्भग्रंथ प्रबोधनकार ठाकरे यांच्याजवळ नव्हता. म्हणून मुंबईतील प्रमुख ग्रंथ विक्रेत्यांकडून प्रबोधनकारांना हवे ते संदर्भग्रंथ मिळतील अशी स्वत:च्या खर्चाने शाहू महाराजांनी व्यवस्था तर केलीच, पण त्याही पुढे जाऊन ठाकरे यांच्या आगामी ग्रंथाच्या २००० प्रती ५००० रूपयांचा चेक देऊन आगावू खरेदी केल्या असे प्रबोधनकार ठाकरे आपल्या आत्मचरित्रात सांगतात.

वेदोक्त प्रकरणात शाहू विरोधात असणारे प्रा.वि.गो. विजापूरकर यांना त्यांचे 'ग्रंथमाला' मासिक चालविण्यासाठी वर्षाला ५०० रू. चे अनुदान राजर्षींनी मंजूर केले होते.

सत्यशोधकी लेखक दिनकरराव जवळकर यांना शाहूंनी कोल्हापूरला बोलावून तरूण मराठा सुरू केले व त्यांच्या तळपत्या लेखणीला दुहेरी धाररूपी तलवार बनविले.

'महर्षी दयानंद सरस्वती यांचे चरित्र व कामगिरी' या ग्रंथाचे लेखन हरी तुंगार यांनी केले. त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने राजर्षींनी त्याच्या ५०० प्रति दरबारामार्फत खरेदी केल्या. आप्पाजी धुंडीराम मुरतुले उर्फ कवी सुमंत हे

राजर्षींच्या खाजगी खात्यात कारकून म्हणून काम करायचे. कवी सुमंतांना काव्याची विशेष आवड असल्याने ते आपल्याच विश्वात मग्न असायचे. परिणामी कारकुनी कामातील तक्रारींमुळे कवी सुमंतांना नोकरीवरून काढले. पण कवी व कुटुंबाला वाऱ्यावर न सोडता महिना ३५ रू. व्यवस्था करून त्यांना दरबारात राजकवी म्हणून नियुक्त केले.

'दीनमित्र' कार मुकुंदराव पाटील, ग.आ. गवई, राजकवी शं.बं. भोसले यासारख्या अनेक कवींना राजर्षी शाहू छत्रपतींचे प्रेम आणि प्रोत्साहन लाभले होते. त्याबरोबरच आपल्या दरबारात शाहीर लहरी हैदर, शाहीर विठ्ठल बिराजी डोणे, शाहीर रामचंद्र नरहर माळी, शाहीर ईश्वरा माळी इ. उदार आश्रय दिला.

'तमाशा' किंवा 'जलसा' या अस्सल देशी कलेची जोपासना करण्यासाठी राजर्षी शाहू छत्रपती या कलावंतांना प्रोत्साहन देत होते. त्यांचे जाणीवपूर्वक कौतुक करीत होते, त्यांच्या संकटकाळात धावून जात होते, तर दुसरीकडे या गुणी कलावंतांच्या लोककलेचा समाजप्रबोधनासाठी सावधानतेने वापर करून घेत होते. तमाशा हा शृंगाराच्या लावण्यांत आणि प्रीतीची पोपटपंची करण्यात अडकलेला होता. केवळ मनोरंजन हाच हेतू धरून फड गाजविणरा तमाशा त्यांनी बदलून टाकला आणि तमाशाला जनजागरणाचे माध्यम बनवले. तमाशाचे सत्यशोधक जलशात रूपांतर होत असताना त्या जलशांमधून अस्पृश्यता निवारण, जातिभेद नष्ट करणे, सावकारी पाश, हुंडा पद्धती, दारूचे दुष्परिणाम, बुवाबाजी, विधवांचे केशवपन, हिंदु—मुस्लिम ऐक्य, स्वदेशी वस्तूंचा वापर, बालविवाहाचे दुष्परिणाम इ. लोककल्याणाचे विषय हाताळले जावेत यासाठी महाराज दक्ष असत.

**३) कलेला आश्रय :**

राजर्षी शिल्प, चित्र, गायन, वादन, नाटय आणि मल्लविद्येचे चाहते होते. आण्णासाहेब किर्लोस्कर, भाऊराव कोल्हटकर, गणपतराव जोशी, केशवराव भोसले, बाबूराव पेंटर, अल्लादियाँखाँ हैदरबक्ष, केसरबाई केरकर, आबालाल रहिमान, आनंदराव पेंटर, गोविंदराव टेंबे, शाहीर लहरी हैदर आणि बळवंतराव रूकडीकर अशा असंख्य गुणी कलावंतांना राजर्षींनी लौकिकाप्रत नेले. कोल्हापूर हे कलावंतांचे माहेरघर व्हावे, अशी राजर्षी शाहू महाराजांची इच्छा होती. म्हणूनच अनेक क्षेत्रातील गुणी कलावंतांना, आश्रय देऊन आर्थिक सहकार्य करून आणि त्यांच्या पाठीवर शाब्बासकीचा हात फिरवून राजर्षी आपली रसिकता आणि गुणग्राहकता प्रकट करीत असत. राजर्षींसारखा एक दिलदार उदार आणि उमदा राजा गुणी कलाकारांच्या गुणांचे जेव्हा कौतुक करतो, तेव्हा त्याच्या राज्यातील स्थैर्य, संपन्नता आणि शांतता याची प्रचीती येते.

प्रसिद्ध चित्रकार आबालाल रहिमान हे चित्रकलेच्या शिक्षणासाठी मुंबईला गेले होते. त्या ठिकाणी त्यांनी चित्रकलेत विशेष प्रावीण्य मिळविले. अशा या आबालाल यांच्यावर मुंबईत अन्याय झाला. चित्रकलेतील आपली सिद्धहस्तता जाणून त्यांचा विश्वास होता की, आपण परीक्षेत प्रथम येणार. पण प्रथम क्रमांक एका श्रीमंत व वशिल्याच्या मुलाला देण्यात आला. व दुसरा क्रमांक आबालाल यांना देण्यात आला. या कृत्याने निराश झालेले आबालाल कोल्हापूरला परतले. अन्यायाचा आबालाल यांच्या मनावर विपरीत परिणाम झाला. राजर्षींना हे कळताच त्यांनी आबालालच्या आत्मविश्वासाला शाब्दिक खत—पाणी घालण्याचे काम चालू केले. त्याचबरोबर सरकारी शाळेत चित्रकलेचा शिक्षक म्हणून काम करण्यास सांगितले. एव्हढेच नाहीत तर शिकारीला जाताना आबालालला ते घेऊन जात. एकदा त्यांनी बहिरी ससाण्याने आकाशातील उडणाऱ्या पक्षाची शिकार कशी केली हा प्रसंग आबालालला दाखवला आणि तो प्रसंग रेखाटण्यासाठी आबालालला सांगितले. अशाप्रकारे पंचगंगेच्या काठावरची देवळाची, निसर्गसौंदर्याची चित्रे दिसतात ती महाराजांनी आबालालला प्रत्यक्ष त्या ठिकाणी नेऊन काढायला लावली. आबालाल यांच्यासारखा महान कलाकार जो वाया चाललेला होता, त्याला राजर्षींनी उभा केला, फुलविला. त्याचे श्रेष्ठत्व पारखून त्या कोहिनूर हिऱ्याला उजेडात आणण्यचे व मार्गी लावण्याचे काम राजर्षींनी केले. म्हणूनच आबालाल रहिमान सर्वांना कळले.

महाराजांना संगीत नाटकाची आवड आहे, हे जाणून आप्पाशास्त्री नावाचे गृहस्थ आपल्या नातवाची 'गान कला' ऐकवण्यासाठी महाराजांकडे आले. त्या इवल्याशा नारायणाने सुरेल आवाजात सुरेख गायन केले. महाराज त्यांच्यावर प्रसन्न झाले आणि त्याची विचारपूस करू लागले. तेव्हा महाराजांच्या ध्यानी आले की, या नारायणला व्यवस्थित ऐकू येत नाही. महाराजांनी त्या मुलाला मिरजेला डॉ. व्हेल यांच्याकडे उपचारासाठी पाठविले. यानंतर या नारायणाने गाण्यात एक अप्रतिम उंची गाठली. किर्लोस्कर कंपनीत प्रवेश करून 'शाकुंतल' नाटकामधील शकुंतलेची भूमिका केली. पहिल्या अंकातच शकुंतलेच्या वेशात मंचावर आलेल्या नारायणाला पाहून टाळयांचा वर्षाव झाला. हाच नारायण पुढे महाराष्ट्राच्या मराठी रंगभूमीचा आवडता नटसम्राट नारायण राजहंस म्हणजेच 'बालगंधर्व' झाला.

गानक्षेत्रातील महाराजांची घडवलेला आणखी एक अनमोल हिरा म्हणजे केसरबाई केरकर होय. या केसरबाईंना १९३८ साली विश्वभारतीतर्फे सूरश्री ही सूर क्षेत्रातील अत्यंत सन्मानाची व आदराची पदवी रवींद्रनाथ टागोरांनी अर्पण केली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर प्रथम राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या शुभहस्ते संगीत अकॅडमी ॲवार्ड देऊन त्यांना गौरविण्यात आले. तसेच भारत शासनाने त्यांना 'पद्मभूषण' ही बहुमानाची पदवी अर्पण केली.

हिंदी शास्त्रोक्त संगीताची जपणूक करावी आणि नवनवे गायक तयार करावेत याचसाठी कोल्हापुरात स्थापन झालेल्या 'गायन शिक्षण समाज' या संस्थेस राजर्षींनी ६००० रूपयांची देणगी दिली. भारतीय हिंदी संगीताचे शिखर म्हणून नावलौकिक कमविलेल्या अल्लादियाँखाँ या महान गायकाला राजर्षींनी राजाश्रय दिला. किर्लोस्कर नाटक मंडळीच्या 'शाकुंतल' नाटकातील गणपतराव जोशी यांच्या भूमिकेवर महाराज बेहद्द खूश असायचे. केशवराव भोसले यांची 'शारदा'

या नाटकातील शारदेची भूमिकाही राजर्षींना आवडत असे. म्हणूनच 'केशवराव म्हणजे तळपती तलवार आहे' या शब्दात राजर्षी केशवरावांचा गौरव करीत असत. कलाकारांच्या सोयीसाठी राजर्षींनी 'पॅलेस थिएटर' बांधून १९१५ साली युवराज राजाराम महाराज यांच्या शुभहस्ते त्याचे 'मानापमान' या नाटकाच्या प्रयोगाने उद्घाटन केले. 'पॅलेस थिएटर' चे पुढे 'केशवराव भोसले नाटयगृह' असे नाभाभिधान करण्यात आले.

**४) मल्लविद्येची पंढरी :**

कुस्ती या मर्दानी आणि मैदानी खेळांची आवड शाहू छत्रपतींना बालपणापासूनच होती. कुस्ती या मर्दानी छंदाची जोपासना त्यांनी आयुष्याच्या अखेरपर्यंत केली. 'मल्लविद्या ही केवळ तालमीपुरती मर्यादित नाही, तर जगण्यासाठीची अत्यावश्यक कला आहे; अशी ठाम समजूत राजर्षी शाहू महाराजांची होती. कोल्हापुरातील कुस्तीच्या मैदानात पंजाबी मल्लांनी दक्षिणेकडील मल्लांना अस्मान दाखविले होते. पंजाबी पैलवानांसारखे आपले पैलवान तयार करण्यासाठी जुमा पैलवान पंजाबी याला राजाराम कॉलेजच्या तालमीत कुस्ती शिक्षक म्हणून नेमले होते. त्याचबरोबर राजर्षींनी 'दहा कलमी योजना' तयार करून करवीरच्या मल्लांवर मुक्तहस्ते खर्च केला. करवीर संस्थानात रूजलेल्या मल्लविद्येने उत्तरेतही दबदबा निर्माण केला. उत्तर भारतातल्या मल्लांनाही करवीरबद्दल कुतूहल निर्माण करणारे राजर्षी शाहू महाराज मल्लविद्येसह मल्लांसाठीही नवसंजीवनी देणारे वस्ताद ठरले. १८९५ मध्ये मोतीबाग ही सरकारी तालीम सुरू केली. या तालमीच्या प्रवेश द्वारावरच महाराजांनी एक फलक लावला होता. ''पहिली शरीरसंपत्ती, दुसरी पुत्रसंपत्ती आणि तिसरी धनसंपत्ती असेल तोच खरा पुण्यवान.'' शाहू महाराज विजेत्या पैलवानासह पराभूंतांनाही बक्षिसी देऊन त्यांचा गौरव करत. स्वत: मल्ल तयार करणे, वस्तांदाकरवी कसदार मल्ल घडवणे, मल्लांच्या खुराकाची व्यवस्था करणे, व्यायामावर देखरेख, मल्लांसाठी वैद्यकीय सुविधा, मल्लांना राजाश्रय देणे, सरावासाठी उत्तरेकडील मल्लांना करवीरमध्ये आणणे, मोठी बक्षिसे देऊन मल्लांचा सन्मान करणे, वस्तांदांच्या उदरनिर्वाहाची सोय करण्याचे शाहू महाराजांनी ठरविले. देवाप्पा धनगर, शिवाप्पा बेरड, पांडू भोसले, बिरंजा पाटील, रामा पैलवान, अशा अनेक मल्लांना ते स्वत: आखाडयात उतरून नवीन डावपेच शिकवित होते. बाबूजमाल, घोडंपीर, काळाइमाम, बाराइमाम, गंगावेश, बावडेकर आखाडा, रंकाळा, तटाकडील, बजापा माने, महादू गवंडी, बोडके, सरदार, दिलबहार अशा जवळपास शंभराहून अधिक तालमी होत्या. महाराजांच्या प्रयत्नांनाही यश आले. मल्ल हमदुकाका याला शिवाप्पा बेरड याने पन्हाळयाच्या मैदानात आस्मान दाखवले. भोला पंजाबीला कृष्णा मर्दाने या मल्लाने १३ मिनिटांत चित केले. पुढे खाशाबा जाधव यांनी ऑलिम्पिकमध्ये मिळवलेल्या कुस्तीतील पहिल्या पदकाचे श्रेयही शाहू महाराजांच्या प्रयत्नांना जाते. राजर्षी इंग्लंड दौऱ्यावर गेले असता तेथील रोम शहरातील अर्धवर्तुळाकार अशा भव्य आखाडयाने त्यांचे लक्ष वेधून घेतले. त्यातूनच कोल्हापूरचे खासबाग हे जगप्रसिद्ध मैदान साकारले आणि 'मल्लविद्येची पंढरी' म्हणून कोल्हापूरास लौकीक प्राप्त झाला.

**निष्कर्ष :**

१. राजर्षींनी करवीर नगरीत सर्व कलांना राजाश्रय दिल्यामुळेच अनेक कलावंत निर्माण झाले आणि कोल्हापूरची किर्ती 'कलापूर' म्हणून पसरली.

२. विचारांना कृतीची जोड देणारे शाहू महााज कर्ते सुधारक होते.

३. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडण–घडणीमध्ये राजर्षी शाहू महाराजांचा सिंहाचा वाटा आहे.

**समारोप :**

गुणीजनांना समारंभपूर्वक वागणूक देऊन त्यांना सहाय्य करण्यामध्ये राजर्षीचा हातखंडा होता. म्हणून राजर्षी शाहूंना मराठी रंगभूमीचे खरेखुरे चाहते, आश्रयदाते आणि पाठराखे म्हटले जाते.

**संदर्भ :**

१. 'शिक्षणमहर्षी राजर्षी शाहू महाराज' – प्राचार्य रा.तु. भगत

२. राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा – डॉ. जयसिंगराव पवार

३. लोकराजा शाहू छत्रपती – डॉ. रमेश जाधव

४. शाहूंच्या आठवणी – प्रा. नानासाहेब साळुंखे

५. महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत, साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत – व्ही.एन. स्वामी.